| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार**<br>**पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं ०२२- २९४५१००१<br>**Email ID –**<br>**pro.cp.mbvv@mahapolice.gov.in** | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**प्रेसनोट क्रमांक ३५२** **दिनांक १७-१२-२०२१**

# खून करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अर्नाळा पोलीसांनी केले जेरबंद.

दिनांक १०/१२/२०२१ रोजी तक्रारदार श्री. प्रकाश भास्कर वझे यांनी अर्नाळा पोलीस ठाणे येथे माहिती दिली की, ते सकाळी-०८.१५ वाजताचे सुमारास वाडी येथे गेले असता त्यांनी बघितले की, बावखळमध्ये एक अज्ञात इसम पाण्यात बुडुन उताणे स्थितीत पडलेला असून मयत झालेला आहे. सदरबाबत पोलीसांनी पाहणी केली असता प्रथमदर्शनी दिसून आलेल्या स्थितीवरुन अर्नाळा पोलीस ठाणे येथे अकस्मात मृत्यू र.जि.नंबर ७७/२०२१ सिआरपीसी १७४ प्रमाणे दिनांक १०/१२/२०२१ रोजी दाखल करण्यात आला होता.

सदर अनोळखी मयत इसमाचे डावे डोळयाचे भुवईजवळ जखम झाल्याने त्याचा डोळा दिसत नव्हता. गुन्हयातील अनोळखी मयताची ओळख पटविणेकामी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ व सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे सुचनांप्रमाणे दोन वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. तपासादरम्यान अर्नाळा पोलीस ठाण्यास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दिनांक ०९/१२/२०२१ रोजी रात्रौ ०८-३० वाजताचे सुमारास अनोळखी मयत इसम व त्याचे सोबत सदर परिसरात शेतमजुरीचे काम करणारा ‘तेरे नाम’ पुर्ण नांव माहिती नाही व आणखी एक इसम असे तिघेजण मुक्कामपाडा परिसरात फिरत होते. सदर माहितीच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी अर्नाळा मुक्कामपाडा परिसरात तेरे नाम हे टोपन नाव असलेल्या इसमाचा शोध घेतला असता तेरे नाम याचे खरे नांव दिनेश मालकरी असुन तो भंगार वेचण्याचे काम करीत असल्याची माहिती मिळाली. त्या अनुषंगाने विरार डोंगरपाडा चिखलडोंगरी भागात शोध घेवून १) तेरे नाम ऊर्फ दिनेश रघुनाथ मालकरी, रा. वाडा जि. पालघर व २) बुध्या पवार, रा. कामनरोड चिंचोटी हे मिळुन आल्याने त्यांचेकडे मयत इसमाबाबत चौकशी केली असता त्यांनी उडवाउवीचे उत्तरे देवून यातील मयतासोबत ते फिरले असल्याचे व त्याचे नांव संदिप चौधरी, रा. पालघर असे असल्याचे सांगितले. मयताची ओळख पटविणे कामी त्याचे नातेवाईकाचा शोध घेतला असता यातील मयताचे नांव हरेश नथू हाडळ असल्याचे समजले. तसेच वैदयकीय अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाला व यातील मयताचे डोक्यास गंभीर दुखापती झाल्याने त्यास मृत्यु आल्याचा अभिप्राय प्राप्त झाल्याने यातील संशईत तेरे नाम ऊर्फ दिनेश रघुनाथ मालकरी व बुध्या पवार यांचेकडे कसोशिने विचारपूस केली असता यातील मयत व त्यांचेमध्ये माशांची (मच्छी) वाटणी व भंगारविक्रीचे पैशांवरुन वाद झाल्याने डोक्यास दगड मारुन जिवे ठार मारल्याची माहिती दिली.

सदर घटनेबाबत पोउनि. चांगदेव हांडळ यांनी सरकारतर्फे तक्रार देवुन अर्नाळा पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने गुन्हा रजि नंबर ४०१/२०२१ भादंविस कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे दिनांक १६/१२/२०२१ रोजी २०-२० वाजता गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपी १) तेरे नाम ऊर्फ दिनेश रघुनाथ मालकरे वय-३५ वर्षे, रा-मुक्कामपाडा, अर्नाळा, विरार प. ता-वसई, जि-पालघर मुळ राहणार-आमगाव बरफपाडा, मस्ताननाका, मनोर, ता-वाडा, जि-पालघर. व २) नामे- बुध्या ऊर्फ बुधा रत्ना पवार, वय-३० वर्षे, रा-देवाचाभाट, मुक्कामपाडा, अर्नाळा, विरार प. ता-वसई, जि-पालघर मुळ रा-भरमपूर चारोटी ता-डहाणु जि-पालघर यांना अटक करून मा. न्यायालयात हजर केले असता त्यांना ०५ दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. सदर घटनेबाबत कोणताही प्रत्यक्षदर्शि साक्षिदार किंवा पुरावा नसतांना अर्नाळा पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटिकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. चंद्रकांत जाधव, सहा. पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली अर्नाळा पोलीस ठाण्याचे आर. के. माने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पो.उप.निरी हांडळ, तुषार माळोदे, सलगर, पो.हवा. मदने, पो.ना. राजेंद्र पवार, पो. अं आळंगे, कदम, संतोष पवार यांनी केली आहे.

------ooo-------